**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शुक्रवार दिनांक २२ ऑगस्ट २०२५**

**ठळक बातम्या**

1. **भटक्या कुत्र्यांचं लसीकरण आणि नसबंदीसंदर्भात धोरण निर्धारित करण्याचे सर्वोच्च न्यायालयाचे राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांना निर्देश.**
2. **विदर्भातील युवकांकरिता अग्निवीर सैन्य भरती मेळावा २०२५ चं 3 ते 20 सप्टेंबर दरम्यान कामठीमध्ये आयोजन.**
3. **देशाच्या सुरक्षेत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आवश्यक असून, यात तरुणांची भूमिका महत्त्वाची-केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे व्हीएनआयटी नागपूरच्या राष्ट्रीय परिषदेत प्रतिपादन.**
4. **राज्यात आज सर्वत्र उत्साहात साजरा करण्यात येत आहे पोळा; नागपुरात उद्या निघणार मारबतीची मिरवणूक.**

**सर्वोच्च न्यायालय**

राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांना भटक्या कुत्र्यांसंबंधीचं धोरण तयार करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयानं दिले आहेत. अशा प्रकरणांशी संबंधित ज्या याचिका देशभरातल्या विविध उच्च न्यायालयात प्रलंबित असतील, त्या सर्वोच्च न्यायालयात हस्तांतरित करण्याचे आदेशही देण्यात आले. दिल्ली एनसीआर परिसरातले रेबीजची लागण झालेले आणि आक्रमक वृत्तीच्या कुत्र्यांना वगळता उर्वरित भटक्या कुत्र्यांना नसबंदी आणि लसीकरण करून त्यांच्या पूर्वीच्या परिसरात सोडण्यात यावं, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयानं आज दिले आहेत. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश न्यायमूर्ती विक्रम नाथ, संदीप मेहता आणि एन.व्ही.अंजारिया यांच्या पीठानं हे निर्देश दिले आहेत. नवीन निर्देशानुसार, भटक्या कुत्र्यांना खाऊ घालण्याला मनाई करण्यात आली असून त्यांच्यासाठी खाण्याच्या जागा निश्चित करण्यावर भर देण्यात आला आहे. भटक्या कुत्र्यांना हटवण्याच्या कामात अडथळा आणणाऱ्या संघटना किंवा गटावर कठोर कायदेशीर कारवाई केली जाणार आहे, असंही सर्वोच्च न्यायालयानं म्हटलं आहे.

**अग्निवीर भरती**

विदर्भातील अकोला, अमरावती, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नागपूर, वर्धा, वाशिम आणि यवतमाळ या जिल्ह्यांतील सामाईक प्रवेश परिक्षा - सीईई साठी पात्र ठरलेल्या उमेदवारांसाठी सैन्य भरती मेळावा येत्या ३ सप्टेंबर ते १३ सप्टेंबर दरम्यान अल्बर्ट एक्का स्टेडियम, ब्रिगेड ऑफ द गार्ड्स रेजिमेंटल सेंटर, कामठी, नागपूर येथे आयोजित करण्यात आला असून यामध्ये अग्निवीर जनरल ड्यूटी, अग्निवीर टेक्निकल, अग्निवीर क्लर्क/स्टोअर कीपर टेक्निकल, अग्निवीर ट्रेड्समन यांची भरती केली जाणार आहे. याबाबत अधिक माहिती देत आहेत संरक्षण विभागाचे जनसंपर्क अधिकारी विंग कमांडर रत्नाकर सिंग....

***करीब पाच हजार एस्पिरंट्स जिन्होंने रिटन एग्जाम क्वालीफाई कर लिया है उनके यहां पर पार्टिसिपेट करने की उम्मीद है। जिसमें फिजिकल टेस्ट और मेडिकल किया जायेगा और फिर जो शार्ट लिस्टेड कैंडिडेट हैं, उनको ट्रेनिंग के लिए भेजा जायेगा। बट इसके अलावा जो सेंट्रल कैटेगरीज हैं, जिसमें कि महाराष्ट्र, दमन द्वीप, दादर नगर हवेली, गोवा, यहाँ के जो और एंटायर गुजरात के जीतने भी कैंडिडेट्स हैं, जो सेंट्रल कैटेगरी के लिए हैं, जैसे रिलीजियस हेड्स, मेडिकल कार्टोग्राफर इनकी जो रैली हैं उनको भी किया जायेगा।***

उमेदवार त्यांच्या ओळखपत्रांसह लॉगिन केल्यानंतर भारतीय सैन्याचं संकेतस्थळ joinindianarmy.nic.in वरून त्यांचे रॅली प्रवेशपत्र डाउनलोड करू शकतात.

**ऑनलाईन गेमिंग-सायबर तज्ज्ञ**

ऑनलाईन गेमिंग प्रोत्साहन आणि नियमन विधेयक २०२५ काल राज्यसभेनं संमत केलं. संसदेच्या संमतीनंतर आता हे विधेयक राष्ट्रपतींच्या मंजुरीनंतर कायद्यात रूपांतरित होईल. या विधेयकाविषयी सायबर तज्ज्ञ डॉ. विशाल लिचडे यांचे मत जाणून घेऊया -

***ऑनलाइन गेमिंगमुळे होणारी फसवणूक, आर्थिक नुकसान, मानसिक आणि अल्पवयीन मुलांची शोषण आणि व्यसन लागण्याची शक्यता या सर्वांपासून या विधेयकामुळे सुरक्षा तसेच कंझ्युमर प्रोटेक्शन मिळेल कारण याचं उल्लंघन करणाऱ्यांना तीन ते पाच वर्षांपर्यंत तुरुंगवास आणि जवळपास दोन कोटी रुपयांपर्यंत दंड तसेच आयटी ॲक्ट अंतर्गत गेमिंग प्लॅटफॉर्मवर बंदीसुद्धा घातली जाईल आता हे सर्व कायद्यांच्या चौकटीत आल्यामुळे गेमिंग प्लॅटफॉर्मचे नियमित VAPT म्हणजे सायबर सिक्युरिटी ऑडिट करणे शक्य झाले आहे. या कायद्यामुळे राष्ट्रीय स्तरावर ऑनलाईन गेमिंग ऑथोरिटी अंतर्गत बेकायदेशीर गेमिंग प्लॅटफॉर्मवर देखरेख शक्य होईल. त्यामुळे फसवणुकीसाठी वापरल्या जाणाऱ्या ऑफशोअर किंवा अंडरग्राउंड गेमिंग सर्व्हरला तोंड देण्यासाठी इंटरनेट सर्व्हिस प्रोव्हायडर सर्टीन आणि लॉन्फोर्समध्ये धोक्याची गुप्तचर माहिती समायिक करणे शक्य झाले आहे.***

**अंतराळ दिवस**

२३ ऑगस्ट २०२३ रोजी चंद्राच्या पृष्ठभागावर विक्रम लँडरचे सुरक्षित आणि सहज अवतरण चांद्रयान -३ मोहिमेने पूर्ण केले. या मोहिमेसह भारत चंद्रावर उतरणारा चौथा आणि चंद्राच्या दक्षिण ध्रुवीय प्रदेशाजवळ उतरणारा पहिला देश बनला. या घटनेप्रीत्यर्थ  २३ ऑगस्ट हा दिवस 'राष्ट्रीय अंतराळ दिन' म्हणून घोषित करण्यात आला आहे. नागपूरच्या रामन विज्ञान केंद्र आणि तारांगणद्वारे उद्या 'भारतीय अंतराळ वारसा' प्रदर्शन तसेच अंतराळ प्रश्नमंजुषा निवड फेरी द्वारे हा दिवस साजरा करण्यात येणार असून प्रदर्शनाचे उद्घाटन सकाळी ११ वाजता डॉ.एस. वेंकट मोहन, संचालक राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी संशोधन संस्था-सीएसआयआर नागपूर यांच्या हस्ते होईल. हे प्रदर्शन दररोज सकाळी ९.३० ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत जनतेसाठी खुले राहील.

**परिषद**

देशाच्या सुरक्षेत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आवश्यक आहे आणि यामध्ये तरुणांची भूमिका महत्त्वाची आहे. बदल ही एक शाश्वत प्रक्रिया असून आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून आपण आपले भविष्य अधिक सुरक्षित आणि आनंददायी बनवू शकतो, असे प्रतिपादन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केले. ते आज विश्वेश्वरय्या राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था व्हीएनआयटी येथे 'राष्ट्रीय सुरक्षेत युवकांची भूमिका' या विषयावरील दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेला दूरदृश्य प्रणालीद्वारे संबोधित करताना बोलत होते.

***हमारा जो भविष्य है, यह हमारे आज की टेक्नोलॉजी नॉलेज, विज़न इसके साथ जुड़ा हुआ है एक समय लड़ाई होती थी, उसमें जो पद्धतियां थी, जो वेपन्स थे, आज जो हो रही है, जो पद्धतियां है वो सब बदल चुकी है हमारे बीच में यह कहा जाता है कि जो कल था वो आज नहीं आज है, वो कल नहीं परिवर्तन यह एक कन्टीन्यूअस प्रोसेसर हर क्षेत्र में होती है और इसलिए निश्चित रूप से आज हमारे देश में विशेष रूप से इंटरनल सिक्योरिटी, उसके साथ एक्सटर्नल सिक्योरिटी, इकोनॉमिक सिक्योरिटी और साइबर सिक्योरिटी इन चारों बातों की तरफ हमें मैक्सिमम अच्छी टेक्नोलॉजी का उपयोग करके काम करना होगा।***

पंतप्रधानांनी ठरवलेलं 'आत्मनिर्भर भारत' चे ध्येय साध्य करण्याच्या दिशेने या दोन दिवसीय परिषदेत विषयतज्ञ अंतर्गत सुरक्षा, आर्थिक सुरक्षा आणि सायबर सुरक्षा यासारख्या महत्वाच्या मुद्द्यांवर चर्चा करणार आहेत. युथ फॉर नेशनच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या राष्ट्रीय परिषदेचे अध्यक्षपद व्हीएनआयटीचे कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष, माडा भूषी मदन गोपाल यांनी भूषवले. स्वागत भाषण संस्थेचे संचालक प्रा.प्रेमलाल पटेल यांनी केले. उद्या शनिवारी, लेफ्टनंट जनरल व्ही.के.चतुर्वेदी, संदीप पाटील, ब्रिजेश सिंग, सरिता कौशिक आणि निवृत्त एअर मार्शल शिरीष देव परिषदेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतील.

**पोळा सण**

पोळ्याचा सण आज राज्यात सर्वत्र साजरा होत आहे. वर्षभर शेतात राबवणाऱ्या बैलांप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा सण साजरा केला जातो. बैलांची रंगरंगोटी करण्यासाठी तसंच सजावटीच्या साहित्याने ग्रामीण भागातल्या बाजारपेठा फुलून गेल्याचं दिसून येत आहे. भंडारा जिल्हयात डोकेसरांडी इथं बैलाचं काम करणाऱ्या ट्रॅक्टरसाठी आधुनिक पद्धतीने पोळ्याचं आयोजन केलं जातं. गेल्या काही वर्षांपासून या उपक्रमाला गावकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून हा अनोखा सोहळा गावाच्या एकतेचे प्रतीक ठरत आहे. यवतमाळच्या पोस्टल ग्राउंडवर नगर परिषदेने भरविलेल्या बैल पोळ्यात आमदार बाळासाहेब मांगुळकर यांनी बैलांची पूजा करून पोळा फोडला. 'एक नमन गौरा पार्वती, हर बोला, हर हर महादेव' चा गजर करीत शेतकऱ्यांनी झडत्या म्हटल्या. त्यानंतर उत्कृष्ट बैलजोड्यांना बक्षीस देण्यात आले. दरम्यान, उद्या तान्हा पोळ्याच्या निमित्ताने नागपुरातील काळी आणि पिवळी मारबत बडगा मिरवणूक जागनाथ बुधवारी, इतवारी, नेहरू पुतळा, तीन नाल चौक, शहीद चौक, गांधी पुतळा, महाल, झेंडा चौक, गांधी गेट

परिसरातून निघणार आहे. नागपुरातील हा मारबत उत्सव १४४ वर्षे जुना आहे. शहर पोलीस आयुक्त रवींद्र कुमार सिंगल यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेतला असून मिरवणुकीदरम्यान शहरात कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलिस विभाग सज्ज आहे.

**सॉइल सर्व्हे**

केंद्रीय कृषी मंत्रालयाच्या अखत्यारित येणाऱ्या भारतीय कृषी संशोधन परिषदेच्या अमरावती रोड, नागपूर इथल्या राष्ट्रीय मृदा सर्वेक्षण आणि उपयोजन संस्था- एनबीएसएस अँड एलयूपी चा ४९ वा स्थापना दिन साजरा उद्या दि.२३ ऑगस्ट रोजी सकाळी 10 वाजता करण्यात येणार आहे. ब्युरोचे संचालक डॉ.एन.जी.पाटील यांनी सांगितले की नागपूर येथील डब्ल्यूसीएलचे अध्यक्ष-सह-व्यवस्थापकीय संचालक जयप्रकाश द्विवेदी याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असतील. 1956 मध्ये स्थापन झालेल्या या संस्थेचे मुख्यालय नागपूरमध्ये आहे. ही संस्था देशासाठी मातीचे माहिती भंडार म्हणून कार्य करते. मृदा सर्वेक्षण, दूरसंवेदन, भूमि मूल्यांकन आणि भूमि वापर योजनांमध्ये संशोधन आणि प्रशिक्षण कार्यक्रमही संस्थेतर्फे राबवले जातात.

**परवाना रद्द**

चढ्या दरानं खतांची विक्री करून शेतकऱ्यांना लुबाडणाऱ्या गोंदिया जिल्ह्यातल्या ३ कृषी सेवा केंद्रांचे परवाने रद्द करण्यात आले असून ६ कृषी केंद्राचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत. गोंदिया जिल्हा कृषी अधीक्षक कार्यालयाच्या वतीनं तैनात करण्यात आलेल्या भरारी पथकानं तपासाअंती ही कारवाई केली आहे. फसवणूक झालेल्या शेतकऱ्यांनी कृषी विभागाशी संपर्क साधावा, असं आवाहन जिल्हा कृषी अधिक्षकांनी केलं आहे.

**हवामान**

हवामान! विदर्भात आज वर्धा, चंद्रपूर, यवतमाळ, बुलढाणा, वाशीम या जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी तर उर्वरित सर्व जिल्ह्यांमध्ये बहुतांश सर्वत्र पाऊस पडण्याची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान केंद्राने व्यक्त केली आहे. पुढील दोन दिवसांत वादळी वारे आणि वीजगर्जनेसह यवतमाळ आणि वाशीम जिल्ह्यांत तुरळक ठिकाणी, तर अन्य सर्व जिल्ह्यांत बहुतांश ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे.

*****